

पारनेर दर्शन



वर्ष ४ अंक २१९, गुरुवार ५ नोव्हेंबर २०२६ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये



नाद जनतेचा... विजय नीलेश लंके साहेबांचा !

अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत दणदणीत विजय!

जनतेचे लाडके नेतृत्व

खासदार डॉ. नीलेशजी लंके साहेब यांचे हार्दिक अभिनंदन !

: शुभेच्छुक :



श्री. मच्छिंद्रशेठ लंके
कन्हैय्या उद्योग समुह, निघोज



श्री.बाळासाहेब लंके



श्री.सोनू लंके

शिवमल्हार एंटरप्राईजेस, निघोज

शॉर्ट न्यूज

राजकीय आरोप-प्रत्यारोपांना वेग

■ **मुंबई :** शिवसेनेच्या नगरसेविका मीनाक्षी शिंदे यांनी एका हत्या प्रकरणातील पीडित कुटुंबाला पोलीस संरक्षण देण्याची मागणी केली आहे. या प्रकरणात आपल्याला गोवण्याचा कट रचला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी संबंधित राजकीय आरोपांमुळे प्रकरणाला वेगळे वळण मिळाले आहे. या प्रकरणाच्या तपासाकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

डेंग्यूच्या रुग्णसंख्येत वाढ

■ **पुणे :** शहरात ऑक्टोबर महिन्यात डेंग्यूच्या रुग्णसंख्येत मोठी वाढ नोंदविण्यात आली आहे. शहरातील चार आरोग्य विभागांमध्ये एकूण रुग्णांपैकी निम्मे रुग्ण आढळल्याची माहिती समोर आली आहे. पावसाळ्यानंतर साचलेल्या पाण्यामुळे डासांची उत्पत्ती वाढण्याची शक्यता आहे. महापालिकेच्या आरोग्य विभागाने प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर देण्याची गरज व्यक्त केली आहे. नागरिकांनी परिसर स्वच्छ ठेवून पाणी साचू देऊ नये, असे आवाहन करण्यात येत आहे.

इलेक्ट्रिक बस सेवेला बळ

■ **छ.संभाजीनगर :** शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी ३५ नव्या इलेक्ट्रिक बसेस दाखल करण्यात येणार आहेत. ओलेक्ट्रा कंपनीकडून या बसेस उपलब्ध करून देण्यात येत आहेत. पर्यावरणपूरक वाहतुकीला प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. डिझेलवरील अवलंबित्व कमी होण्यास मदत होणार आहे. प्रवाशांना आधुनिक आणि आरामदायी बससेवा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

खड्ड्यांमुळे वाहनचालक त्रस्त

■ **कोल्हापूर :** शहरातील रस्त्यांवरील खड्ड्यांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. खड्डे बुजविण्याच्या कामासाठी ठेकेदारांकडून टाळाटाळ होत असल्याचे वृत्त समोर आले आहे. त्यामुळे नागरिक आणि वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. पुणे-बंगळुरू महामार्गावरील किणी परिसरात आंदोलनामुळे वाहतुकीवरही परिणाम झाला आहे. रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

डिजिटल अटकेत ज्येष्ठाची फसवणूक

■ **लातूर :** येथील एका ज्येष्ठ नागरिकाची डिजिटल अरेस्टच्या नावाखाली २८ लाख ५१ हजार रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी सहा जणांना ताब्यात घेतले आहे. तपासादरम्यान फसवणुकीच्या रकमेचा मागोवा घेण्यात येत आहे. ऑनलाइन माध्यमातून भीती दाखवून पैसे उकळण्याचे प्रकार वाढत असल्याचे पुन्हा स्पष्ट झाले आहे. अनोळखी व्यक्तींच्या धमक्यांना बळी पडू नये, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

तीन चुलींवर भाजलेली भाकर... काळजाला भिडलेली कहाणी!

एक भाकर, तीन चुली' कादंबरीतून एका संघर्षशील मातेच्या जीवनाचे वास्तववादी दर्शन; पारनेरच्या मातीतल्या लेखकाच्या साहित्यिक यशाचा अभिमान व्यक्त करणारा डॉ. बाबासाहेब फंड यांचा अनुभवपूर्ण अभिप्राय



लेखक देवा झिंजाड यांची 'एक भाकर, तीन चुली' ही बहुप्रतीक्षित कादंबरी नुकतीच वाचली. कादंबरी तर वाचून संपते, पण तिच्यातील वेदना आणि अस्वस्थ करणारे वास्तव मनातून जाता जात नाही. 'एक भाकर तीन चुलींवर भाजल्याने अगदी करपून जाते. या भाकरीचा तीन चुलींवर होणारा प्रवास म्हणजे केवळ एका स्त्रीची, तिच्या वेदनेची कहाणी नाही, तर पुरुषप्रधान सामाजिक व्यवस्थेत स्त्रीच्या वाट्याला येणाऱ्या संघर्षाची, अवहेलनेची आणि तरीही न हरलेल्या, उमेदीने उभी राहिलेल्या जिद्दीची कहाणी आहे,' असे मला वाटते.

अकाली वैधव्य, कौटुंबिक आणि सामाजिक कुचंबणा, समाजविघातक प्रवृत्तींशी जीवघेणा संघर्ष... एवढे सारे सोसूनही मुलांच्या भवितव्यासाठी खंबीरपणे उभी राहणारी आई मनाला विलक्षण भावते. आपल्या मुलाने शिकावे, मोठे व्हावे, आपल्या वाट्याला आलेल्या दुःखाची सावलीही त्याच्या आयुष्यावर पडू नये, यासाठी काळजावर दगड ठेवून त्याला शिक्षणासाठी स्वतःपासून दूर पाठवणारी माऊली... माय-लेकरांच्या या ताटातुटीतील वेदना शब्दांपलीकडच्या आहेत.

या कादंबरीचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे तिची नायिका ही काल्पनिक नसून खुद्द लेखकाची आई आहे. त्यामुळे लेखनात कुठेही कृत्रिमता किंवा ओढूनताणून आणलेली भावनिकता जाणवत नाही. याउलट, प्रत्येक प्रसंगाला वैयक्तिक जीवनाच्या वास्तविक संघर्षाची किनार असल्याने वाचकांच्या फक्त मनालाच नव्हे, तर अगदी काळजाला भिडण्याची क्षमता या पुस्तकात आहे. ग्रामीण जीवनातील कटू वास्तव, भोवतालच्या माणसांचे खोटे मुखवटे, स्त्रीच्या वाट्याला येणारे भोग आणि समाजव्यवस्थेतील विसंगती यांचे चित्रण लेखकाने कोणताही लखलखीत मुलामा न देता, जसेच्या तसे मांडले आहे. हेच या पुस्तकाचे खरे वैशिष्ट्य होय.

आजवरच्या ग्रामीण साहित्यातील कथा-कादंबऱ्यांमध्ये आढळणारे केवळ मनोरंजन, विनोद किंवा वरवरचे आणि सकारात्मक चित्रण करण्यापलीकडे जाऊन, वास्तवाचे बोचरे आणि मनाला अस्वस्थ करणारे, वाचणाऱ्या प्रत्येकाला अंतर्मुख करायला लावणारे चित्रण करून त्याचे जसेच्या तसे दर्शन घडवण्याचे धाडस या लेखनात दिसते. पुरुषी वर्चस्वाच्या संस्कृतीत स्त्रीचे आयुष्य कसे भरडले जाते, याविषयी लेखकाच्या मनात असलेली चीडही प्रत्येक पानातून जाणवते. त्यामुळेच बालपणापासूनच लेखकाचे एक स्त्री-संवेदनशील व्यक्तिमत्त्व घडत गेले असावे.

देवा झिंजाड यांनी आपल्या आईच्या संघर्षाला शब्दरूप देताना केवळ तिचे दुःख मांडले नाही, तर तिच्या जगण्याला आणि मातृत्वाच्या जिद्दीला एक साहित्यिक अभिवादन केले आहे. हीच गोष्ट खऱ्या अर्थाने वाचकांच्या अंतर्मनाचा खोलवर ठाव घेते. वाचनाची आवड असल्याने अनेक पुस्तके वाचली जातात. त्यातील काहीच आपल्याला आवडतात. पण काही पुस्तके थेट काळजाला भिडतात आणि मनात कायमची घर करून राहतात. देवा झिंजाड यांचे 'एक भाकर, तीन चुली' हे त्यापैकीच एक! 'एक भाकर, तीन चुली' ही केवळ एका बाईची किंवा आईची कथा नाही, तर ती अशा असंख्य अनामिक मायांची व्यथा आहे, ज्या स्वतःच्या आयुष्याची राखरांगोळी झाली तरी तिची झळ आपल्या लेकरांच्या स्वप्नांना लागू देत नाहीत.

कथेतील नायिका 'पारू'चे दुःख, तिने भोगलेल्या यातना, मानसिक आणि शारीरिक कुचंबणा आणि तरीही हार न मानता उभारी घेण्याची धडपड पाहता, पुस्तक वाचणाऱ्या प्रत्येकाला आपले दुःख तिच्यासमोर तिळमात्र असल्याची जाणीव नक्कीच होत असणार. त्यामुळे खऱ्या अर्थाने हे पुस्तक प्रकाशित झाल्यापासून गेल्या तीन वर्षांपासून अनेक खचलेल्या मनांना उभारी देण्याचे काम करत आहे. अनेक नाउमेद आणि अस्वस्थ मनांच्या पंखांना बळ देत त्यांना निराशेच्या गर्तेतून बाहेर काढून त्यांची गाडी पुन्हा रुळावर आणत आहे.लेखक देवा झिंजाड यांचे आणि त्यांच्या धारदार लेखणीचे हेच खरे, मोठे यश आहे. वाचकांच्या मनात घर करून राहिलेल्या वास्तववादी ग्रामीण लेखक देवा झिंजाड यांचे मनःपूर्वक अभिनंदन!

लेखक देवा झिंजाड सर हे ज्या पारनेर तालुक्यातील आहेत, तीच माझीसुद्धा मातृभूमी असल्याने आपल्या मातीतला लेखक, कवी एक मोठा प्रथितयश साहित्यिक म्हणून नावारूपास आल्याचा मनस्वी आनंद आहे. पारनेरच्या मातीला तसा संघर्ष नवीन नाही. परिस्थितीशी दोन हात करण्याचे बाळकडू इथली माती उपजतच सर्वांना देत असते. सृजनतेचे बीज इथल्या खडकाळ माळरान जमिनीतसुद्धा तरारून उगवते. कादंबरीत वर्णन केलेली बहुतांश गावे परिचयाची आणि माझ्या गावापासून जास्तीत जास्त ३५ ते ४० किलोमीटर अंतरावरील असल्याने पुस्तक वाचत असताना आपसूकच एक आपलेपणा निर्माण झाला होता.

एका प्रसंगातील उल्लेखित 'रांधे' गाव हे माझ्या सख्ख्या आत्याचे गाव. तेथील आवारी पाटील हे आमचे आत्याकडील नातेवाईक. अर्थातच पुस्तक वाचताना केवळ भावनिकच नव्हे, तर आत्मीयतेची जुळणी झाल्याचाही भास होत होता.ऑफिसचे काम संपल्यानंतर दररोज अशा सलग चार दिवसांच्या प्रत्येकी तीन तासांच्या बैठकीत संपूर्ण पुस्तक वाचून झाले. वाचन सुरू झाल्यावर थांबूच नये, असेच वाटत राहिले. एका दिवसाचे वाचन थांबल्यावर दुसरा दिवस येईस्तोवर कथेत पुढे काय असेल, याची उत्सुकता मनात कायम शिगेला असायची. त्यामुळे कोणताही खंड न पडता सलग चार दिवसांत पुस्तकाचे वाचन पूर्ण केले.

डॉ. बाबासाहेब फंड
सारोळा अडवाई, ता. पारनेर

वाचकांच्या लेखणीतून

चक्षुर्वै सत्यम्

सूर्यबिंब जरी बचकेचि एवढे।
परि प्रकाशासि त्रैलोक्य थोकडे।
शब्दाची व्याप्ती येणे पाडे।
अनुभवावी।।
- संत ज्ञानेश्वर



श्रीमद्भगवद्गीता हा आपला संस्कृत ग्रंथ मूलतः रसाळ आहे. संत ज्ञानेश्वरांनी तीवर ज्ञानेश्वरीच्या रूपाने मराठी टीका लिहिली. त्यामुळे मूळ गीतेची रसवत्ता दस पटीने वाढली आहे. असे गेल्या शतकातील मराठी विन्दान लेखक श्री.ना.बनहट्टी यांनी त्यांच्या वाङ्मय विमर्श या ग्रंथांत म्हटले आहे. म्हणूनच तर मराठीतील ज्ञानेश्वरी ग्रंथाला गीतालंकार ते बिरुद प्राप्त झाले आहे. त्याच ज्ञानेश्वरी या ग्रंथात संत ज्ञानेश्वर म्हणतात, सूर्याचे बिंब दिसताना जरी बचकभर दिसले तरी आपला प्रकाश पसरविण्यासाठी त्याला (स्वर्ग, मृत्यू आणि पाताळ असे) त्रैलोक्यसुद्धा अपुरे पडते. शब्दाची व्याप्ती याप्रमाणे जाणावी.

भारतीय दर्शनानुसार शब्द हा आकाशाचा गुणधर्म आहे. आकाश व्यापक आहे. शब्द तर त्याहूनही किती तरी व्यापक आहे. तेच संत ज्ञानेश्वरांनी किती सुंदर दृष्टान्त देऊन आपल्याला समजावून सांगितले आहे.

चक्षु म्हणजे डोळा. तो मूलतः संस्कृत शब्द आहे. त्यापासूनच चाक्षुष हा संस्कृत शब्द सिद्ध झाला. आपल्या मराठीतही हा शब्द वापरला जातो. मराठीत चक्षूपणा हा गुण असलेल्या माणसाला चाक्षुस (सं. चाक्षुष) म्हणतात. चाक्षुस (सं. चाक्षुष) म्हणजे पारखी. चक्षूंचा म्हणजे डोळ्यांचा संबध दिसण्याशी आहे. प्रत्येक गोष्टीचा रंग, आकार या गोष्टी पारखून घेणारा. असा त्याचा मूळ अर्थ. चव, ध्वनी, स्पर्श आदी गुण पारखून घेणाऱ्या माणसासाठीही चाक्षुस हे विशेषण मराठीत वापरले जाते. शुद्ध चाक्षुस या मराठी शब्दाच्या जागी काही वेळेला ग्रामीण मराठी बोलीत चकसू वा चखूट शब्दही वापरला जातो. त्यामुळे मूलतः संस्कृत चक्षु शब्दाचे इथे गुणवर्धन झाले आहे किंवा त्याच्या अर्थाची व्यापकता वाढली आहे.

हे एक चक्षुर्वै सत्य आहे. अंतःचक्षूंनी पाहिलेले सत्य आहे.

नाना ढवळे,
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहिल्यानगर.

'कॉफी विथ सीईओ' कार्यक्रमासाठी संजय रोडे सरांची निवड!

तळवाडी जिल्हा परिषद शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा
शिष्यवृत्ती मार्गदर्शनातून शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान



शिरूर : प्रतिनिधी
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तळवाडीचे (कर्डे) मुख्याध्यापक आणि शिष्यवृत्ती परीक्षेचे मार्गदर्शक शिक्षक संजय रोडे सर यांची 'कॉफी विथ सीईओ' या विशेष संवाद कार्यक्रमासाठी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी घेतलेल्या मेहनतीची आणि शिष्यवृत्ती परीक्षेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी केलेल्या योगदानाची दखल घेत ही निवड करण्यात आल्याने तळवाडी शाळेच्या शैक्षणिक शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

जिल्हा परिषद शाळांमधील गुणवत्तापूर्ण शिक्षण, नावीन्यपूर्ण उपक्रम आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करणाऱ्या शिक्षकांशी थेट संवाद साधण्याच्या उद्देशाने 'कॉफी विथ सीईओ' हा उपक्रम राबविला जातो. या उपक्रमाच्या माध्यमातून शैक्षणिक क्षेत्रात वेगळा ठसा उमटविणाऱ्या शिक्षकांना आपल्या कामाचा अनुभव, शैक्षणिक प्रयोग, यशस्वी उपक्रम आणि भविष्यातील शैक्षणिक संकल्पना मांडण्याची संधी मिळते.

संजय रोडे सर यांनी मुख्याध्यापक म्हणून शाळेची शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्याबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची आवड, जिद्द आणि आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. विशेषतः शिष्यवृत्ती परीक्षेच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन, नियमित सराव, संकल्पनांची स्पष्टता आणि परीक्षाभिमुख अध्यापनावर त्यांचा भर राहिला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्येही गुणवत्ता आणि स्पर्धात्मक परीक्षांना सामोरे जाण्याची क्षमता आहे, हा विश्वास त्यांनी आपल्या कार्यातून अधोरेखित केला आहे.

'कॉफी विथ सीईओ' या कार्यक्रमासाठी झालेली निवड ही केवळ संजय रोडे सरांच्या वैयक्तिक कार्याची पोचपावती नसून तळवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षकवृंद, विद्यार्थी आणि पालकांसाठीही अभिमानाची बाब ठरली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल शैक्षणिक वर्तुळातून त्यांचे अभिनंदन होत असून, त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

वसुबारस : गोमातेचे दिव्यत्व!

गोवत्स द्वादशी विशेष



दीपावली या प्रकाशपर्वाचा मंगलमय प्रारंभ वसुबारसने होतो. गोमातेप्रती श्रद्धा आणि कृतज्ञता व्यक्त करणारा हा सण भारतीय कृषिसंस्कृती, धार्मिक परंपरा आणि आध्यात्मिक विचारांचा सुंदर संगम आहे. भारतीय संस्कृतीत प्रत्येक सणामागे केवळ धार्मिक परंपरा नसते, तर जीवन जगण्याचा उदात्त विचार आणि संस्कारांची शिकवण दडलेली असते. निसर्ग, पशुपक्षी आणि समस्त सजीवांप्रती प्रेम व आदर व्यक्त करण्याची प्रेरणा या परंपरांतून मिळते. आश्विन वद्य द्वादशीला वसुबारस साजरी केली जाते. या दिवसाला गोवत्स द्वादशी असेही म्हणतात. गाय आणि तिच्या वासराचे पूजन करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली जाते. हिंदू धर्मपरंपरेत गायीला मातृत्व, मांगल्य आणि समृद्धीचे प्रतीक मानले जाते. गोमातेच्या ठायी सर्व देवतांचा वास असल्याची श्रद्धा आहे. त्यामुळे गोसेवा आणि गोसंवर्धनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

वसुबारसचे आध्यात्मिक माहात्म्य केवळ गोपूजनापुरते मर्यादित नाही. चराचर सृष्टीत परमेश्वराचे अस्तित्व पाहणे आणि प्रत्येक सजीवाशी करुणेने वागणे हाच भक्तीचा मूलभूत विचार आहे. गोमातेचे पूजन म्हणजे मातृत्व, पोषण आणि त्यागभावनेचा सन्मान होय. समुद्रमंथनातून प्राप्त झालेल्या कामधेनूंपैकी नंदा धेनूच्या पूजनाशी या व्रताचा संबंध जोडला जातो, अशी धार्मिक मान्यता आहे. या दिवशी गायीला व वासराला स्नान घालून हळद-कुंकू, फुले आणि अक्षता अर्पण करून पूजा केली जाते. महिला कुटुंबाच्या सुखसमृद्धीसाठी आणि संततीच्या आरोग्यासाठी व्रत करतात. घरासमोर रांगोळी काढून, तुळशीपुढे आणि दारात पणत्या लावून दीपावलीच्या आगमनाचा आनंद साजरा केला जातो.

भारतीय ग्रामीण जीवनात शेती आणि पशुधन यांचे अतूट नाते आहे. दूध, दही, ताक, लोणी आणि तूप यांसारखे पदार्थ आहाराचा भाग आहेत, तर शेणखतामुळे जमिनीची सुपीकता टिकविण्यास मदत होते. बैल शेतीच्या कामात महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे गोवंश हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधार राहिला आहे.

संत ज्ञानेश्वर महाराजांनी पसायदानातून 'भूतां परस्परे पडो मैत्र जीवांचे' अशी विश्वकल्याणाची प्रार्थना केली. संत तुकाराम महाराजांनीही दया, क्षमा आणि शांतीचा संदेश दिला. संतविचारांनुसार जीवमात्रांविषयीचा दयाभाव आणि निःस्वार्थ सेवा हीच खरी ईश्वरभक्ती आहे. आजच्या काळात वसुबारसचा संदेश कृतीतून जपणे आवश्यक आहे. आजारी व भाकड गायींची देखभाल, भटक्या जनावरांना अन्न-पाणी, गोशाळांना सहकार्य आणि पशूंवरील अत्याचार रोखणे ही गोसेवेची खरी रूपे आहेत. पशुधनाला संतुलित आहार, स्वच्छ निवारा आणि वेळेवर पशुवैद्यकीय उपचार मिळणेही तितकेच महत्त्वाचे आहे. सणाच्या दिवशी पूजन आणि वर्षभर दुर्लक्ष, अशी विसंगती आपल्या आचरणात असता कामा नये.

वसुबारसपासून दीपावलीच्या आनंदमय सणमालिकेला सुरुवात होते. घराघरांत पणत्या प्रज्वलित होत असताना मनामध्येही करुणेचा दीप उजळला पाहिजे. गोमातेची सेवा आणि समस्त सजीवांप्रती प्रेम, कृतज्ञता व सेवाभाव जपणे हाच वसुबारसचा खरा आध्यात्मिक संदेश आहे. कारण धर्माचा खरा प्रकाश पूजाअर्चेतच नव्हे, तर प्रत्येक सजीवाविषयीच्या माणुसकीत प्रकट होतो!

ह.भ.प.विशाल रघुनाथ गडगे

पारनेर दर्शन

गुरुवार ५ नोव्हेंबर २०२६ पान ३

घोषणांचा पाऊस, शेतकऱ्यांच्या खात्यात ठणठणाट!

आदित्य ठाकरेंचा सरकारला सवाल । शेतकऱ्यांच्या मदतीसाठी शिवसैनिकांनी खांद्याला खांदा लावून उभे राहावे । मदतीच्या घोषणा नको, शेतकऱ्यांच्या खात्यात प्रत्यक्ष पैसे जमा करा । कर्जवसुली थांबवा । आदित्य ठाकरे यांचा सरकारवर घणाघात



पारनेर : भगवान गायकवाड

राज्यातील शेतकरी अतिवृष्टी, ओला दुष्काळ आणि कोरड्या दुष्काळाच्या संकटात सापडला असून, त्याला या संकटातून बाहेर काढण्यासाठी शिवसैनिकांनी खांद्याला खांदा लावून उभे राहण्याची गरज आहे. शेतकऱ्यांच्या मदतीसाठी शिवसैनिक, महिला आघाडी, युवासेना आणि युवतीसेनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन पुढाकार घेतला आहे, ही अभिमानाची बाब आहे. मात्र, शेतकऱ्यांना केवळ मदतीच्या घोषणा नकोत, तर प्रत्यक्ष आर्थिक मदत त्यांच्या खात्यात जमा झाली पाहिजे, अशी ठाम भूमिका शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनी बुधवारी पारनेर येथे सुरू करण्यात आलेल्या शेतकरी मदत केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी मांडली.

शेतकरी मदत केंद्रातून प्रत्यक्ष मदतीचा संकल्प

शेतकरी मदत केंद्राच्या माध्यमातून महिला व पुरुष शेतकरी, शेतमजूर आणि युवा शेतकऱ्यांची माहिती संकलित करण्यात येणार आहे. मात्र, हे केंद्र केवळ माहिती गोळा करण्यापुरते मर्यादित राहणार नसून, संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मदत मिळवून देण्यासाठी काम करणार आहे. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी तसेच प्रशासकीय पातळीवर पाठपुरावा करण्यासाठी शिवसैनिकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. सरकारकडून जाहीर होणारी मदत कागदावर किंवा बॅनरवर दिसण्याऐवजी शेतकऱ्यांच्या बांधावर आणि त्यांच्या बँक खात्यात पोहोचली पाहिजे. मदत प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचते की नाही, याची खातरजमा केली जाईल. त्यासाठी स्थानिक प्रशासकीय अधिकारी, आमदार, खासदार आणि मंत्र्यांना जाब विचारण्याची भूमिका शिवसेनेने घेतली आहे.

शेतकऱ्यांच्या दारात वसुलीच्या नोटिसा कशासाठी?

शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट असताना सहकारी बँका आणि वित्तीय संस्थांकडून कर्जवसुलीसाठी नोटिसा पाठवल्या जात आहेत. सरकारने कर्जवसुली थांबवण्याचे आदेश दिले असतानाही शेतकऱ्यांना वसुलीचा तगादा लावला जात असल्याचा मुद्दा आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केला. शेतकरी संकटात असताना त्याच्या पाठीशी उभे राहण्याऐवजी त्याला कर्जवसुलीच्या नोटिसा देणे अन्यायकारक आहे. मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणात तातडीने लक्ष घालून कर्जवसुली थांबवावी, अशी मागणी त्यांनी केली.

मान्यवरांची उपस्थिती

विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, आमदार सुनील शिंदे , राजेंद्र दळवी जिल्हाप्रमुख, युवा सेना जिल्हाप्रमुख निलेश खोडदे, तालुकाप्रमुख डॉक्टर श्रीकांत पठारे, युवासेना तालुकाप्रमुख अनिल शेटे , डॉ. भास्करराव शिरोळे, शिवसेना जिल्हा उपप्रमुख, किसनराव सुपेकर, शेतकरी संघटना तालुकाप्रमुख तथा ज्येष्ठ शिवसैनिक गुलाबराव नवले, प्रशांत निंबाळकर, उपतालुकाप्रमुख संदीप मोढवे, शहर प्रमुख संतोष घोरपडे.

३२ हजार कोटींच्या पॅकेजचा लाभ कुणाला?

अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी मागील वर्षी मुख्यमंत्र्यांनी ३२ हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले होते. मात्र, या पॅकेजमधील किती निधी प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाला, किती शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळाला, असा सवाल आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केला. अधिवेशनात जाहीर करण्यात आलेल्या कर्जमाफीबाबतही त्यांनी सरकारला धारेवर धरले. कर्जमाफीसाठी अनेक अटी आणि शर्ती लादल्या जात आहेत. केवायसीसह आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करूनही शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा झालेले नाहीत. विविध जिल्ह्यांच्या दौऱ्यात शेतकऱ्यांशी संवाद साधताना त्यांच्या समस्या समोर आल्या आहेत. त्यामुळे सरकारने घोषणांपलीकडे जाऊन शेतकऱ्यांना प्रत्यक्ष दिलासा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

पाच हजारांची मदत म्हणजे शेतकऱ्यांची थट्टा!

दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना पाच हजार रुपयांची मदत देण्याची घोषणा करण्यात आली. मात्र, प्रत्यक्षात किती शेतकऱ्यांना ही मदत मिळाली, याचा हिशेब सरकारने द्यावा. शेतकऱ्यांचे ट्रॅक्टरचे हप्ते थकले आहेत, मुलांच्या शाळा आणि महाविद्यालयांचे शुल्क भरायचे आहे, शेतीसाठी घेतलेले कर्ज फेडायचे आहे. अशा परिस्थितीत पाच हजार रुपयांची मदत शेतकऱ्यांसाठी पुरेशी आहे का, असा सवाल ठाकरे यांनी केला.नुकसान होऊनही अनेक शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम मिळालेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणी आणखी वाढल्या आहेत. सरकारने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी ठोस निर्णय घ्यावेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

दुष्काळाचे संकट दीड वर्ष कायम राहण्याची भीती

सध्याची दुष्काळी परिस्थिती ही नेहमीप्रमाणे उन्हाळ्यात निर्माण झालेली नाही. यंदा पावसाळ्यातच दुष्काळाचे संकट उभे राहिले आहे. त्यामुळे त्याचे परिणाम पुढील वर्षभर ते दीड वर्ष जाणवण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांसमोर पाणी, पीक, जनावरांचा चारा आणि आर्थिक संकट अशी अनेक आव्हाने उभी राहणार आहेत. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना केवळ तात्पुरती मदत करून चालणार नाही, तर सातत्याने त्यांच्या पाठीशी उभे राहावे लागेल. शिवसैनिकांनी शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी गावोगावी मदतकार्य उभे करावे आणि शासकीय मदत मिळेपर्यंत पाठपुरावा करावा, अशी भूमिका यावेळी मांडण्यात आली. शेतकऱ्यांच्या संकटात त्यांना आधार देणे ही केवळ राजकीय जबाबदारी नसून सामाजिक बांधिलकी आहे. सरकारने मदतीच्या घोषणा करण्यापेक्षा त्या प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याची कार्यवाही करावी, असा स्पष्ट संदेश आदित्य ठाकरे यांनी या निमित्ताने दिला.

जि. प., पं. स. निवडणुकीत विरोधक भुईसपाट होतील !

खासदार लंके यांचा विश्वास । बँकेतील विजयानंतर निलेश लंके मळगंगा देवीच्या चरणी!



निघोज : प्रतिनिधी

राज्यातील जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या निघोज येथील मळगंगा देवीचा आशीर्वाद आणि जनतेचे भक्कम पाठबळ यामुळेच गेल्या दहा ते पंधरा वर्षांपासून आपण सातत्याने यशस्वी वाटचाल करत आहोत. अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत विक्रमी मताधिक्याने संचालकपदी निवड झाल्यानंतर आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीतही विरोधक भुईसपाट होतील, असा ठाम विश्वास खासदार नीलेश लंके यांनी व्यक्त केला.

अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत दणदणीत विजय मिळवल्यानंतर खासदार लंके यांनी प्रथम सुपा येथे सत्कार स्वीकारला. त्यानंतर पारनेर येथील सत्कार समारंभाला उपस्थित राहून ते थेट निघोज येथील जागृत देवस्थान मळगंगा देवीचा दर्शनासाठी दाखल झाले. देवीचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतल्यानंतर मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टच्या कार्यालयात त्यांचा सन्मान करण्यात आला.

विरोधक एकत्र आले, मात्र जनतेची साथ !

यावेळी बोलताना खासदार लंके म्हणाले, आपल्याला थांबविण्यासाठी सर्व विरोधक एकत्र आले. मात्र पंचायत समिती सदस्यापासून आमदार आणि खासदार म्हणून काम करताना आपण जनतेची सेवा केली. मळगंगा मातेच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या निघोज नगरीसह संपूर्ण मतदारसंघात मोठ्या प्रमाणावर विकासकामे केली. त्यामुळेच जनतेने आपल्यावर विश्वास दाखवून जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत विक्रमी मताधिक्याने विजयी केले.

विजयाची किमया राज्याला कळली!

जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीतील विक्रमी विजय हा जनतेच्या विश्वासाचा आणि केलेल्या विकासकामांचा परिणाम असल्याचे सांगत खासदार लंके म्हणाले, ''विक्रमी मताधिक्याने विजय मिळविण्याची किमया केवळ नीलेश लंकेच करू शकतात, याची जाणीव आता संपूर्ण राज्याला झाली आहे. देशाचे नेते शरदचंद्र पवार यांचा आशीर्वाद आपल्या पाठीशी आहे. त्यामुळे कितीही विरोधक एकत्र आले, तरी विजय आपलाच होणार, हा आजवरचा इतिहास आहे. जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीतील विजयामुळे खासदार नीलेश लंके यांच्या समर्थकांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर निघोज येथील मळगंगा देवीच्या दर्शनाला विशेष राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे.

मळगंगा ट्रस्टच्या वतीने सत्कार

मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे अध्यक्ष वसंत कवाद आणि उपाध्यक्ष अमृताशेठ रसाळ यांच्या हस्ते खासदार नीलेश लंके यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शिवसेनेचे जिल्हा उपाध्यक्ष डॉ. भास्करराव शिरोळे, माजी सरपंच ठकाराम शेठ लंके, ट्रस्टचे सर्व विश्वस्त, सचिव शांताराम कळसकर, सहसचिव विश्वास शेटे, बाबासाहेब कवाद निघोज ग्रामीण सहकारी संस्थेचे पदाधिकारी व संचालक, निघोज सोसायटीचे पदाधिकारी व संचालक, निघोज परिसर कृषी फलोद्यान सहकारी संस्थेचे पदाधिकारी व संचालक, श्री. बाबासाहेब कवाद ग्रामविकास सेवाभावी संस्थेचे पदाधिकारी व विश्वस्त, ग्रामपंचायत सदस्य तसेच लोकनेते निलेश लंके प्रतिष्ठानचे पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विराटच्या वादळी खेळीने भारताची विजयी सलामी!

न्यूझीलंडवर डीएलएसनुसार ५ विकेट्सनी मात अर्शदीपची भेदक गोलंदाजी

ईडन पार्क : प्रतिनिधी

पावसाच्या व्यत्ययाने प्रभावित झालेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात भारतीय संघाने न्यूझीलंडवर डकवर्थ लुईस (डीएलएस) नियमानुसार ५ विकेट्सनी दणदणीत विजय मिळवला. प्रथम गोलंदाजी करताना भारतीय गोलंदाजांनी न्यूझीलंडचा डाव ४०.२ षटकांत १८५ धावांवर गुंडाळला. पावसामुळे भारतासमोर ३२ षटकांत १४३ धावांचे सुधारित लक्ष्य ठेवण्यात आले. विराट कोहलीच्या आक्रमक ७४ धावा आणि कर्णधार शुभमन गिलच्या संयमी ३७ धावांच्या जोरावर भारताने २२.४ षटकांत ५ विकेट्स राखून लक्ष्य गाठले. या विजयासह भारताने पाच सामन्यांच्या मालिकेत विजयी सलामी दिली.



धावांचा पाठलाग करताना भारताची सुरुवात निराशाजनक झाली. काइल जेमिसनने पहिल्याच षटकातील शेवटच्या चेंडूवर रोहित शर्माला मिचेल सँटनरकरवी झेलबाद केले. रोहितला खातेही उघडता आले नाही. मात्र, त्यानंतर शुभमन गिल आणि विराट कोहली यांनी न्यूझीलंडच्या गोलंदाजांवर वर्चस्व गाजवले.

दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी १०४ चेंडूंमध्ये ११३ धावांची दमदार भागीदारी केली. गिलने ५६ चेंडूंत ३७ धावा करताना पाच चौकार लगावले. तर विराटने आक्रमक फलंदाजीचे प्रदर्शन घडवत अवघ्या ५१ चेंडूंत ७४ धावा कुटल्या. त्याच्या खेळीत १३ चौकार आणि एका षटकाराचा समावेश होता.

भारत विजयाच्या उंबरठ्यावर असताना नॅथन स्मिथने शुभमन गिलला बाद करून ही जोडी फोडली. त्यानंतर जेकब डफीने विराट कोहलीला टीम सायफर्टकरवी झेलबाद केले. विराटच्या विकेटनंतर अक्षर पटेल शून्यावर माघारी परतला, तर श्रेयस अय्यरने १५ धावा केल्या. अखेरीस केएल राहुल आणि नमन धीर यांनी संयमी फलंदाजी करत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

तत्पूर्वी भारतीय कर्णधाराने नाणेफेक जिंकून न्यूझीलंडला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केले. भारतीय गोलंदाजांनी सुरुवातीपासूनच न्यूझीलंडच्या फलंदाजांवर दबाव कायम ठेवला. अर्शदीप सिंहने भेदक गोलंदाजी करत चार विकेट्स मिळवल्या, तर गुरनूर ब्रारने तीन फलंदाजांना माघारी धाडले. अंशुल कंबोजनेही दोन विकेट्स मिळवत न्यूझीलंडच्या डावाला खिंडार पाडले. न्यूझीलंडची अवस्था ३५.१ षटकांत १४६ धावांवर नऊ विकेट्स अशी झाली होती. त्यामुळे दीडशे धावांचा टप्पाही गाठणे कठीण वाटत होते. मात्र, तळाच्या फलंदाजांनी प्रतिकार करत संघाला सन्मानजनक धावसंख्येपर्यंत पोहोचवले.

मंत्रालयापासून एफडीए पर्यंत मनसेचा धडक मोर्चा!

पारनेरच्या निकृष्ट रेशन धान्याचा पर्दाफाश । भुजबळ-मुंढेंकडून कारवाईचे आश्वासन

मुंबई : प्रतिनिधी

पारनेर तालुक्यातील शासकीय धान्य गोदामातून गोरगरीब लाभार्थ्यांना वितरित करण्यात येणाऱ्या निकृष्ट, किडे, आळ्या, सोंडे व जाळ्या लागलेल्या तसेच कुबट वास येणाऱ्या धान्याचा गंभीर प्रश्न आता राज्याच्या मंत्रालयापासून अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए) आयुक्तांपर्यंत पोहोचला आहे. गेल्या तीन महिन्यांपासून सुरू असलेल्या या प्रकाराविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पारनेर तालुकाध्यक्ष अविनाश मुरलीधर पवार यांनी आक्रमक भूमिका घेत दोन स्वतंत्र स्तरांवर पाठपुरावा केला आहे. अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ आणि एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याचे आश्वासन दिल्याने पुरवठा विभागात खळबळ उडाली आहे.



आयुक्तांच्या दारात पुराव्यांसह तक्रार

मंत्रालयातील पाठपुराव्यानंतर २ नोव्हेंबर रोजी मनसेचे तालुकाध्यक्ष अविनाश पवार यांनी मुंबईतील वांद्रे येथीलएफडीए भवनात राज्याचे अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी निकृष्ट धान्याबाबत पुराव्यांसह लेखी तक्रार सादर केली. एफडीए कार्यालयाने शिक्कामोर्तब करून निवेदन स्वीकारले. या प्रकरणात तातडीने धान्याचे नमुने जप्त करून प्रयोगशाळेत तपासणी करण्याचे निर्देश देण्यात येतील. नमुने निकृष्ट अथवा मानवी आरोग्यास अपायकारक आढळल्यास गोदाम व्यवस्थापक आणि संबंधित पुरवठा अधिकाऱ्यांवर अन्न सुरक्षा कायदा २००६ अंतर्गत गुन्हे दाखल करून कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन आयुक्त मुंढे यांनी दिल्याचे पवार यांनी सांगितले.

दोषींवर गुन्हे दाखल करण्याची मागणी

मनसेचे तालुकाध्यक्ष अविनाश पवार यांनी ३ नोव्हेंबर रोजी मंत्रालयात राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांची भेट घेऊन लेखी निवेदन सादर केले. पारनेर तालुक्यातील सुपा, वासुंदे, खडकवाडी, पळसपूर, निघोज यांसह शंभराहून अधिक स्वस्त धान्य दुकानांमध्ये निकृष्ट दर्जाचे धान्य वितरित होत असल्याचा मुद्दा त्यांनी पुराव्यांसह मंत्र्यांसमोर मांडला. तांदळामध्ये जिवंत आळ्या, गव्हामध्ये सोंडे, धान्याला जाळ्या तसेच कुबट वास येत असल्याने हे धान्य खाण्यायोग्य नसल्याचे पवार यांनी निदर्शनास आणून दिले. विशेषतः लहान मुले, गर्भवती महिला आणि वृद्धांच्या आरोग्याशी हा प्रकार खेळ करणारा असल्याचा आरोप त्यांनी केला. गरीब जनतेच्या जीवाशी खेळणाऱ्या तहसीलदारांसह संबंधित पुरवठा अधिकारी आणि दोषींवर तातडीने एफआयआर दाखल करण्याची मागणी त्यांनी केली.

तहसीलदारांचे लेखी पत्र; तरीही धान्य बदलले नाही

पारनेरच्या तहसीलदार गायत्री सौंदाणे आणि पुरवठा अधिकारी प्रवीण वाडाई यांना २१ व २२ ऑक्टोबर रोजी निवेदन देऊनही कारवाई झाली नसल्याचा आरोप मनसेने केला आहे. तहसीलदारांनी पत्र क्रमांक १४६/२०२६ आणि १५१/२०२६ अन्वये धान्य निकृष्ट असल्याचे लेखी मान्य केले असतानाही आजपर्यंत एकाही दुकानातील धान्य बदलण्यात आले नसल्याचे पवार यांनी स्पष्ट केले. २९ ऑक्टोबर रोजी महिला अधिकाऱ्याचा सन्मान राखत गांधीगिरीच्या मार्गाने चांगल्या तांदळाचा पुलाव भरवून अनोखे आंदोलन करण्यात आले. मात्र, त्यानंतरही गोदामाचा पंचनामा, निकृष्ट धान्याची जप्ती किंवा लाभार्थ्यांना चांगल्या धान्याचे वितरण झाले नसल्याचा दावा मनसेने केला आहे. गेल्या तीन वर्षांपासून तालुका दक्षता समिती स्थापन करण्यात आली नसल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे.



दुष्काळाच्या सावटात वंचितांच्या आनंदाचा प्रकाश!

सचिन नरवडे, इंजि. प्रवीण फलके यांचा पुढाकार

ढवळपुरी : प्रतिनिधी

दिवाळी म्हणजे आनंदाचा, प्रकाशाचा आणि आपुलकीचा सण! मात्र, यंदाच्या दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आणि शेतमजूर कुटुंबांच्या दिवाळीवर आर्थिक संकटाचे सावट आहे. अशा परिस्थितीत समाजातील गरजू कुटुंबांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्यासाठी मॅक्स उद्योग समूहाचे सर्वेसर्वा सचिन नरवडे आणि युवा उद्योजक इंजि. प्रवीण फलके यांनी पुढाकार घेतला आहे. युवा फाऊंडेशन ढवळपुरी यांच्या सहकार्याने गावातील तब्बल ६०० गरजू, दुष्काळग्रस्त शेतकरी व शेतमजूर कुटुंबांना दिवाळी किटचे वाटप करण्यात आले. या उपक्रमातून सामाजिक बांधिलकी, सेवाभाव आणि माणुसकीचे दर्शन घडले असून, परिसरात या उपक्रमाचे कौतुक होत आहे.



आर्थिक संकटात सणाचा आनंद द्विगुणित

यंदा पावसाच्या अनिश्चिततेमुळे आणि दुष्काळी परिस्थितीमुळे शेती व्यवसाय अडचणीत आला आहे. शेतकरी आणि शेतमजूर कुटुंबांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत असून, दैनंदिन गरजा भागवितानाही मोठी कसरत करावी लागत आहे. अशा परिस्थितीत दिवाळीच्या सणासाठी आवश्यक वस्तूंची खरेदी करणे अनेक कुटुंबांसाठी आव्हानात्मक ठरत आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन सचिन नरवडे आणि इंजि. प्रवीण फलके यांनी सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव ठेवत मदतीचा हात पुढे केला. ६०० कुटुंबांपर्यंत दिवाळी किट पोहोचवून त्यांच्या सणातील आनंद वाढविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

नियोजनबद्ध कार्यातून उपक्रम यशस्वी

या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ दिवाळी किटचे वाटप करून सामाजिक जबाबदारी पूर्ण न करता, प्रत्यक्ष गरजू कुटुंबांपर्यंत मदत पोहोचविण्यासाठी विशेष नियोजन करण्यात आले होते. लाभार्थी कुटुंबांची माहिती संकलित करणे, गावातील दुर्गम भागांत घरोघरी जाऊन कूपन वाटप करणे, किट वितरणाची व्यवस्था करणे आणि प्रत्येक लाभार्थ्यापर्यंत मदत पोहोचविणे, अशा विविध जबाबदाऱ्या युवा फाऊंडेशनच्या कार्यकर्त्यांनी पार पाडल्या. कार्यकर्त्यांच्या एकजुटीने, समन्वयाने आणि नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे हा उपक्रम यशस्वी झाला. गावातील सामाजिक कार्यकर्ते, पदाधिकारी आणि युवकांनीही या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला.

सामाजिक बांधिलकीतून माणुसकीचा आदर्श

आजच्या धावपळीच्या जीवनात अनेकजण स्वतःच्या प्रगतीचा विचार करतात. मात्र, समाजातील गरजू घटकांच्या अडचणी ओळखून त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणारे हात समाजासाठी प्रेरणादायी ठरतात. दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या शेतकरी आणि शेतमजूर कुटुंबांना दिवाळीच्या निमित्ताने मदत करून त्यांच्या चेहऱ्यावर समाधान निर्माण करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. सचिन नरवडे आणि इंजि. प्रवीण फलके यांच्या पुढाकाराला युवा फाऊंडेशनच्या कार्यकर्त्यांनी दिलेली साथ ही सामाजिक एकोपा आणि सेवाभावाचे उत्तम उदाहरण ठरली आहे. गरजू कुटुंबांच्या दिवाळीत आनंदाचा प्रकाश पसरविणारा हा उपक्रम ढवळपुरी परिसरात कौतुकाचा विषय ठरला आहे.

मान्यवरांची उपस्थिती

या कार्यक्रमाला सचिन नरवडे, इंजि. प्रवीण फलके, उपसरपंच बबन पवार, अमोल ठाणगे, होणाभाऊ घोगरे, संतोष गोयकर, देविदास फलके, बबन राठोड, नंदू गावडे, इंजि. वसंत चितळकर, नंदू वाघ, संतोष थोरात, विश्वनाथ वाघ, गणेश पारखे, बाबाजीशेठ चौधरी, दादाभाऊ व्यवहारे, आसिफ शेख, धनराज चौधरी, गणेश ठोकळ, गोटीराम पवार, भानुदास मोरे, विजय सांगळे, दिनेश चौधरी, बाळशीराम ठोकळ, संपत व्यवहारे, आरिफ शेख, संभाजी नवले, महेश ठोकळ, अभिमन्यू चौधरी, दयाराम चौगुले, केशव वाव्हळ आणि फिरोज शेख आदी उपस्थित होते.

कार्यकर्त्यांचे विशेष योगदान

या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी बबन काका राठोड, संदीप चव्हाण, कृष्णा आव्हाड, प्रवीण परशुराम जाधव, प्रवीण कनीराम जाधव, रवी पवार, चिमाजी भले, राजू पथवे, संतोष गोयकर, तुषार चौगुले, अबू दरेकर, प्रवीण भनगडे, लहू भनगडे, वैभव खांडके आणि संदीप वाव्हळ यांनी विशेष परिश्रम घेतले.

हंग्याच्या स्टेला मारिसचा जिल्ह्यात डंका!

१५ खेळाडू राज्यस्तरावर

हंगा : प्रतिनिधी

अहिल्यानगर जिल्हा स्केटिंग मॅरेथॉन स्पर्धेत पारनेर तालुक्यातील हंगा येथील स्टेला मारिस कॉन्व्हेन्ट स्कूलच्या स्टेला स्केटिंग क्लबने दमदार कामगिरी करत जिल्ह्यात द्वितीय क्रमांक पटकावला. आत्रे पाटील पब्लिक स्कूल, अहिल्यानगर येथे नुकत्याच पार पडलेल्या या स्पर्धेत जिल्ह्यातील विविध नामांकित स्केटिंग क्लब सहभागी झाले होते. या स्पर्धेत स्टेला मारिस स्कूलच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कौशल्य, जिद्द आणि आत्मविश्वासाच्या जोरावर उल्लेखनीय यश संपादन केले.



जिल्हास्तरावर यशाची भरारी

सीबीएसई अभ्यासक्रमाची गुणवत्ता लाभलेल्या स्टेला मारिस कॉन्व्हेन्ट स्कूलमध्ये अवघ्या दोन महिन्यांपूर्वी स्केटिंग प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात आला. इतक्या अल्पावधीत शाळेच्या स्टेला स्केटिंग क्लबने जिल्हास्तरीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविल्याने शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील यशस्वी वाटचालीची सुरुवात झाली आहे. क्रीडा शिक्षक ऋषिकेश औटी यांच्या मार्गदर्शनाखाली विविध वयोगटांतील जवळपास ४० खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग घेतला.

१५ खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धे साठी निवड

या जिल्हास्तरीय स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या स्टेला स्केटिंग क्लबच्या १५ खेळाडूंची पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्केटिंग मॅरेथॉन स्पर्धेसाठी निवड झाली आहे. जिल्हास्तरावर यश मिळविल्यानंतर थेट राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी होण्याची संधी मिळाल्याने खेळाडू, पालक आणि शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. विजेत्या खेळाडूंना मेडल आणि ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.

मान्यवरांकडून अभिनंदन

यशस्वी खेळाडूंना प्राचार्या सिस्टर आदर्श मरिया, सिस्टर प्रभा, सिस्टर तेजस, सिस्टर ग्रेस यांच्यासह तालुका क्रीडा अध्यक्ष बापुराव होळकर, प्रतिभा मेश्राम, विनायक नवले, अनिल शिंदे, पोपट दिघे आणि अभय सर यांनी शुभेच्छा देत अभिनंदन केले.तसेच जिल्हा स्केटिंग मॅरेथॉनचे प्रमुख गोरख धात्रक, सुशील केदार, आशिष दहिफळे आणि राहुल तिवारी यांचे मोलाचे मार्गदर्शन खेळाडूंना लाभले.

खेळाडूंच्या मेहनतीचा अभिमान

प्राचार्या सिस्टर आदर्श मरिया यांनी खेळाडूंच्या यशाबद्दल समाधान व्यक्त करताना सांगितले, गेल्या दोन महिन्यांत सुरू झालेल्या स्केटिंग वर्गाचे हे यश आमच्यासाठी खूप मोठे आहे. खेळाडूंच्या मेहनतीमुळे आणि ऋषिकेश औटी यांच्या मार्गदर्शनामुळे आज आपल्या शाळेचे नाव जिल्ह्यातून राज्यपातळीवर पोहोचले आहे. सर्व खेळाडू आणि पालकांच्या सहकार्याचा मला खूप अभिमान आहे. पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेतही आपले खेळाडू नक्कीच चमकतील.

विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला

क्रीडा शिक्षक ऋषिकेश औटी यांनी या यशाचे श्रेय खेळाडूंची मेहनत, पालकांचा विश्वास आणि शाळेच्या पाठिंब्याला दिले. ते म्हणाले, हा विजय केवळ मेडलचा नाही, तर मुलांच्या आत्मविश्वासाचा आहे. पालकांनी दाखवलेल्या विश्वासामुळे आणि शाळेने दिलेल्या पाठिंब्यामुळे हे शक्य झाले. पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेतही आपले १५ खेळाडू चांगली कामगिरी करतील आणि स्टेला मारिसचे नाव राज्यात झळकवतील, याची मला पूर्ण खात्री आहे.

पालकांकडून समाधान व्यक्त

स्केटिंग क्षेत्रातील या यशामुळे विद्यार्थ्यांच्या पालकांमध्येही उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. शाळेने अल्पावधीत विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रात उपलब्ध करून दिलेल्या संधी आणि खेळाडूंनी मिळविलेल्या यशाबद्दल पालकांनी समाधान व्यक्त केले. जिल्हास्तरीय यशानंतर आता राज्यस्तरीय स्पर्धेत स्टेला स्केटिंग क्लबचे खेळाडू कशी कामगिरी करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

विद्यार्थ्यांच्या हातून साकारणार गडकिल्ल्यांचा इतिहास!

शिवबा दुर्गसंवर्धन परिवाराची तालुकास्तरीय किल्ले बनवा स्पर्धा

निघोज : प्रतिनिधी

दिवाळीच्या सुट्टीत विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव देतानाच छत्रपती शिवाजी महाराजांचा गौरवशाली इतिहास आणि महाराष्ट्राच्या दुर्गवैभवाची ओळख नव्या पिढीला करून देण्याच्या उद्देशाने शिवबा सोशल फाउंडेशन अंतर्गत शिवबा दुर्गसंवर्धन परिवाराच्या वतीने भव्य तालुकास्तरीय किल्ले बनवा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये ऐतिहासिक वारशाबद्दल अभिमान, गडकिल्ल्यांविषयी आत्मीयता आणि दुर्गसंवर्धनाची जाणीव निर्माण करण्याचा अभिनव उपक्रम हाती घेण्यात आला आहे.



कल्पकतेला ऐतिहासिक वारशाची जोड

या स्पर्धेत १६ वर्षांखालील विद्यार्थ्यांना सहभागी होता येणार आहे. किल्ल्यांची प्रतिकृती तयार करताना पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करण्यास प्राधान्य देण्यात आले आहे. किल्ल्याची आकर्षक रचना, त्यामागील ऐतिहासिक संदर्भ, नावीन्यपूर्ण संकल्पना आणि प्रभावी सादरीकरण या बाबींवर स्पर्धकांनी विशेष लक्ष केंद्रित करावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. केवळ मातीचे किल्ले बनविण्यापुरती ही स्पर्धा मर्यादित नसून, प्रत्येक किल्ल्यामागील इतिहास समजून घेणे, त्याचे महत्त्व जाणून घेणे आणि शिवकालीन स्थापत्यकलेची ओळख करून घेणे, हा या उपक्रमाचा मुख्य हेतू आहे.

व्हिडिओ संकलनाद्वारे होणार परीक्षण

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी नावनोंदणी करणे आवश्यक असून, प्रवेश शुल्क १०० रुपये निश्चित करण्यात आले आहे. स्पर्धेचे परीक्षण व्हिडिओ संकलनाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ शनिवार, दि. १५ नोव्हेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार आहे.

इतिहासाच्या जतनासाठी आवाहन

छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास हा केवळ पुस्तकी ज्ञान न राहता तो विद्यार्थ्यांच्या कृतीतून आणि कल्पकतेतून जिवंत व्हावा, गडकिल्ल्यांच्या संवर्धनाची प्रेरणा नव्या पिढीला मिळावी आणि महाराष्ट्राच्या ऐतिहासिक वारशाबद्दल अभिमानाची भावना निर्माण व्हावी, या उद्देशाने शिवबा दुर्गसंवर्धन परिवार सातत्याने प्रयत्नशील आहे. या स्पर्धेत तालुक्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपल्या कल्पकतेतून शिवकालीन इतिहासाचे दर्शन घडवावे, असे आवाहन शिवबा दुर्गसंवर्धन परिवाराच्या वतीने तसेच शिवबा संघटनेचे अध्यक्ष अनिल शेटे यांनी केले आहे.

विजेत्यांसाठी आकर्षक बक्षिसांची रेलचेल

विशेष म्हणजे, स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनकार्याची ओळख करून देणारे शिवचरित्र पुस्तक भेट म्हणून देण्यात येणार आहे. त्यामुळे स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वाचनाची आणि इतिहास जाणून घेण्याची प्रेरणाही मिळणार आहे.

गणपतराव देठे यांना 'आयडॉल पुरस्कार' जाहीर

तीस वर्षांच्या शैक्षणिक सेवेचा गौरव



निघोज : प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य शिक्षण संशोधन परिषद, पुणे यांच्या वतीने प्रदान करण्यात येणारा प्रतिष्ठेचा 'आयडॉल पुरस्कार' निघोज येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक गणपतराव काशिनाथ देठे यांना जाहीर झाला आहे. गेल्या तीन दशकांपासून शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ, शाळांचा विकास आणि ग्रामीण भागातील शिक्षणव्यवस्था सक्षम करण्यासाठी त्यांनी केलेल्या कार्याची या पुरस्काराच्या माध्यमातून दखल घेण्यात आली आहे.

गुणवत्तावाढीसाठी सातत्यपूर्ण प्रयत्न

तालुक्यातील विविध जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये शिक्षक, उपमुख्याध्यापक आणि मुख्याध्यापक अशा विविध पदांवर काम करताना देठे यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य दिले. इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी विविध शैक्षणिक परीक्षांमध्ये उत्कृष्ट गुण मिळवावेत, तसेच तालुका, जिल्हा, विभागीय आणि राज्यस्तरीय शैक्षणिक स्पर्धांमध्ये यश संपादन करावे, यासाठी त्यांनी विशेष मेहनत घेतली. विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची आवड निर्माण करणे, त्यांच्या शैक्षणिक क्षमता ओळखून त्यांना योग्य मार्गदर्शन करणे आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाची गोडी लावणे, या बाबींवर त्यांनी सातत्याने भर दिला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळविले.

शैक्षणिक योगदानाची दखल

देठे यांच्या अभ्यासपूर्ण अध्यापन पद्धती, विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची हातोटी आणि शैक्षणिक विकासासाठीच्या तळमळीची विविध स्तरांवर दखल घेण्यात आली आहे. पारनेर तालुका पत्रकार संघ, राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई तसेच निघोज ग्रामस्थांच्या वतीने त्यांना यापूर्वी अनेक वेळा गौरविण्यात आले आहे. आयडॉल पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल निघोज व पंचक्रोशीतील विविध संस्थांचे पदाधिकारी, सरपंच, उपसरपंच, पारनेर तालुका पत्रकार संघ, पत्रकार संघाचे विभागीय कार्यालय निघोज,अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक संघ, पारनेर तालुका प्राथमिक शिक्षक संघ, पंचक्रोशीतील शिक्षक, शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी व सदस्य यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. ग्रामीण भागातील शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्यासाठी सातत्याने कार्य करणाऱ्या गणपतराव देठे यांच्या शैक्षणिक योगदानाला आयडॉल पुरस्काराच्या रूपाने मिळालेली ही पावती निघोज पंचक्रोशीसाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

तीन दशकांच्या सेवेत घडविले गुणवंत विद्यार्थी

गेल्या तीस वर्षांच्या शैक्षणिक सेवेत देठे यांनी निघोज पंचक्रोशीतील विविध शाळांमध्ये काम केले. या काळात त्यांनी असंख्य विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य उज्वल केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी आज राज्य आणि केंद्र शासनाच्या सेवेत वरिष्ठ अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या माध्यमातून मोठ्या संधी उपलब्ध करून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले आहे.

शिक्षण आपल्या दारी उपक्रमातून पटसंख्येत वाढ

सुमारे वर्षभरापूर्वी निघोज जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापकपदी पदोन्नती मिळाल्यानंतर त्यांनी शाळेच्या विकासासाठी विशेष प्रयत्न सुरू केले. शाळेतील विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढविण्यासाठी 'शिक्षण आपल्या दारी' हा उपक्रम राबविला. या उपक्रमाला पालकांचा सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने शाळेची विद्यार्थी संख्या १७५ पेक्षा अधिक झाली आहे. शाळेतील शैक्षणिक वातावरण अधिक समृद्ध करणे, विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे आणि पालकांचा जिल्हा परिषद शाळांवरील विश्वास वाढविणे, यासाठी त्यांनी विविध उपक्रम राबविले आहेत.

कायद्याच्या अभ्यासात वाचन, चिकित्सक दृष्टिकोन महत्त्वाचा!

प्रत्येक प्रकरणाचा विविध अंगांनी विचार करून पक्षकाराला न्याय मिळवून द्या । ज्येष्ठ विधितज्ञ ॲड. सतीषचंद्र सुद्रिक

कर्जुले हर्या : प्रतिनिधी

कायद्याचा अभ्यास करताना नियमित वाचन, सर्वांगीण ज्ञान आणि चिकित्सक दृष्टिकोन विकसित करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. वकिली व्यवसायात कल्पनाशक्तीचा विकास करून प्रत्येक प्रकरणाचा विविध अंगांनी विचार करणे आवश्यक आहे. कोणतीही केस हाताळताना प्रत्यक्ष घटनास्थळाची पाहणी करावी, तसेच उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाचे महत्त्वपूर्ण न्यायनिवाडे काळजीपूर्वक अभ्यासावेत. या अभ्यासातूनच प्रभावी वकिली आणि न्याय मिळवून देण्याची क्षमता विकसित होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ विधितज्ञ ॲड. सतीषचंद्र सुद्रिक यांनी केले.

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ लॉ कॉलेज, बेल्हे (बांगरवाडी), ता. जुन्नर येथे प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभप्रसंगी ते बोलत होते. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना कायद्याच्या अभ्यासासह न्यायालयीन कामकाजातील विविध पैलूंची माहिती देत वकिली व्यवसायातील आव्हाने आणि संधी यांविषयी मार्गदर्शन केले.



वकिलीसाठी सर्वांगीण ज्ञान आवश्यक

फौजदारी न्यायालयातील कामकाज प्रभावीपणे हाताळण्यासाठी वकिलांनी सर्वंकष अभ्यास करणे गरजेचे आहे. वकील हा केवळ न्यायालयीन कामकाजापुरता मर्यादित नसून त्याला समाजातील विविध क्षेत्रांचे ज्ञान असणे आवश्यक आहे. सामाजिक, आर्थिक आणि परिस्थितीजन्य बाबींचा विचार करून प्रत्येक प्रकरणाकडे पाहण्याची दृष्टी वकिलांनी विकसित केली पाहिजे. न्यायालयीन कामकाजात काळानुरूप अनेक बदल होत असतात. या बदलांचा नियमित अभ्यास करून आपल्या कामकाजात सुसूत्रता आणणे आवश्यक आहे. नवीन वकिलांनी केवळ कायद्याच्या तरतुदींचा अभ्यास न करता त्यांचा प्रत्यक्ष व्यवहारात कसा उपयोग होतो, याकडेही लक्ष द्यावे, असे ॲड. सुद्रिक यांनी स्पष्ट केले.

मान्यवरांची उपस्थिती

या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या स्नेहलताई शेळके, कॅम्पस डायरेक्टर डॉ. राजीव सावंत, प्राचार्य डॉ. सुनील कवडे, प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदीप गाडेकर, ॲड. अंकिता सुद्रिक, ॲड. प्रेरणा भोसले आणि श्री. शिवाजी कुमकर यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते.कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन प्रा. सचिन दरेकर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. पूजा दुग्गड यांनी करून दिला, तर श्री. शिवाजी कुमकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील कवडे यांनी महाविद्यालयाच्या स्थापनेमागील भूमिका, विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या विविध कायदेविषयक सुविधा आणि शैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालयामार्फत विविध कार्यक्रम राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांनी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कायद्याचे शिक्षण घेताना शिस्त, सातत्य आणि अभ्यासाची आवड जोपासण्याचे आवाहनही त्यांनी केले.

पक्षकाराच्या परिस्थितीचा विचार करा

वकिली व्यवसायात पक्षकाराला न्याय मिळवून देणे हे सर्वोच्च उद्दिष्ट असले पाहिजे. मात्र, त्याचवेळी सामाजिक भान राखणे आणि पक्षकाराच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करून जबाबदारीने काम करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. नवोदित वकिलांनी व्यावसायिक कौशल्यासोबत नैतिक मूल्ये जोपासावीत आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी जपावी, असे आवाहन त्यांनी केले.

परिधान कलेक्शनमध्ये खरेदीसोबत समाधानाची भेट!

ग्राहकांच्या विश्वासाचे हक्काचे ठिकाण । दर्जेदार वस्त्रे, आपुलकीची सेवा अन् ग्राहकांच्या पसंतीला प्राधान्य

पारनेर : प्रतिनिधी

ग्राहकांच्या आवडी-निवडी जपत त्यांना परंपरा परिधान कलेक्शनने सातत्याने प्रकारच्या कपड्यांची उपलब्धता, वाजवी सेवा यामुळे या वस्त्रदालनाने ग्राहकांच्या त्यामुळे पारनेर तालुक्यासह तालुक्याबाहेरील मिळत असून, वदरवर्षी खरेदीसाठी येणाऱ्या कौटुंबिक अथवा विशेष कार्यक्रमाच्या देत असल्याच्या प्रतिक्रिया ग्राहकांनी व्यक्त

आपलं..सर्वांच.. हक्काच...
परिधान कलेक्शन्स्

दर्जेदार वस्त्रे आणि समाधानकारक सेवा देण्याची जोपासली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून विविध दर आणि परिधान परिवाराची आपुलकीची मनात विश्वासाचे स्थान निर्माण केले आहे. ग्राहकांचीही परिधान कलेक्शनला पसंती ग्राहकांची संख्या वाढत आहे. कोणत्याही खरेदीसाठी परिधान कलेक्शनलाच प्राधान्य केल्या.

प्रत्येक कार्यक्रमाच्या खरेदीसाठी परिधानच!

परिधान कलेक्शनमध्ये खरेदी करणाऱ्या ग्राहकांनी आपल्या अनुभवातून समाधान व्यक्त केले. आम्हाला आवश्यक असलेल्या विविध प्रकारच्या कपड्यांची निवड येथे करता येते. कोणत्याही कार्यक्रमासाठी कपडे खरेदी करायचे असतील, तर आम्ही परिधान कलेक्शनलाच भेट देतो. येथील सेवा दर्जेदार आहे. परिधान परिवारातील सदस्यांची आपुलकी आणि सहकार्यामुळे खरेदी करताना आनंद मिळतो. खरेदी केल्यानंतर समाधानाची भावना घेऊनच आम्ही येथून बाहेर पडतो, अशा प्रतिक्रिया ग्राहकांनी दिल्या.

आपुलकीच्या सेवेतून विश्वासाचे नाते

ग्राहकांना केवळ वस्त्रे विकणे नव्हे, तर त्यांच्या अपेक्षेनुसार खरेदीचा आनंददायी अनुभव देण्यावर परिधान कलेक्शनचा भर आहे. ग्राहकांच्या आवडी-निवडी जाणून घेऊन त्यांना विविध पर्याय उपलब्ध करून देणे, खरेदीसाठी सहकार्य करणे आणि समाधानकारक सेवा देणे यामुळे ग्राहक व परिधान परिवार यांच्यात जिव्हाळ्याचे नाते निर्माण झाले आहे. तालुक्याबाहेरील ग्राहकांकडूनही मिळणारा प्रतिसाद या वस्त्रदालनाची वाढती लोकप्रियता अधोरेखित करत आहे. नियमित ग्राहकांची पसंती आणि नव्या ग्राहकांचा वाढता ओढा यामुळे दरवर्षी खरेदीसाठी गर्दीत भर पडत आहे.

तिघांना तीन हजारांचे गिफ्ट

परिधान कलेक्शनच्या दिवाळी खरेदी उपक्रमांतर्गत मंगळवार (३ नोव्हेंबर) रोजी काढण्यात आलेल्या लकी ड्रॉमध्ये तीन ग्राहक भाग्यवान ठरले. त्यामध्ये अविनाश तांबे (गोरेगाव), जयश्री सोबले (सोबलेवाडी) आणि श्रीकांत चौधरी (वडझिरे) यांची निवड करण्यात आली. या तिन्ही भाग्यवान ग्राहकांना प्रत्येकी तीन हजार रुपयांचे गिफ्ट देण्यात आले. दिवाळीच्या खरेदीसोबत बक्षीस जिंकण्याची संधी मिळत असल्याने ग्राहकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. दर्जेदार कपडे, वाजवी दर, आपुलकीची सेवा आणि आकर्षक बक्षीस योजना यांचा संगम साधत परिधान कलेक्शनने ग्राहकांच्या विश्वासाचे नाते अधिक दृढ केले आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com